**विषय** - जिल्हा परिषद मुख्यालयातील खाते प्रमुखांना भेटावयास येणारे गटस्तरावरील कर्मचारी यांचे बाबत...

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जावक क्रमांक:साप्रवि/आस्था-८/७७/२०१८
नाशिक, दिनांक: २०/०७/२०१८

## -: परिपत्रक :-

असे निदर्शनास आले आहे कि, गटस्तरावरील कार्यरत कर्मचारी हे गट विकास अधिकारी किंवा खाते प्रमुख यांची परवानगी न घेता जिल्हा परिषद मुख्यालयात कार्यालयीन / वैयक्तिक कामकाजासाठी वारंवार येत असतात तथापी सदर कर्मचारी हे कोणत्या कारणासतव जिल्हा परिषद कार्यालयात आलेले असतात याबाबत हालचाल नोंदवहीत सविस्तर नोंद नसते. त्यामुळे दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होतात.

सबब सदर मुख्यालयांत आलेले कर्मचारी यांचे नाव, हुद्दा, कार्यरत तालुका, दिनांक, कामाचे स्वरुप व स्वाक्षरी अशा आशयाची स्वतंत्र नोंदवही (रजिष्टर) मध्ये नोंद घेवुन सदर रजिष्टर जतन करुन ठेवावयाचे आहे.

तसेच मुख्यालयात आलेले कर्मचारी यांनी गट स्तरावरील खाते प्रमुख यांची परवानगी घेतली आहे किंवा कसे ? हालचाल नोंदवही मध्ये नोंद केली आहे किंवा कसे? याबाबत खाते प्रमुखांनी खात्री करावी. जर कर्मचारी यांनी परवानगी घेतलेली नाही असे निदर्शनास आल्यास सदर कर्मचारी यांची त्या दिवसाची विनावेतन करण्यात यावी याबाबत लेखी गट विकास अधिकारी यांना कळवावे. सर्व खाते प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांनी आपले अधिनस्त सर्व कर्मचा-यांना सदरचे परिपत्रका बाबत सुचना दयाव्यात.

सदरचे परिपत्रकाची तात्काळ अमंलबजावणी करण्यात येऊन, स्थायी आदेश संचिकेमध्ये सामील करण्यांत यावे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**१. खाते प्रमुख, जिल्हा परिषद, नाशिक(सर्व)--------------**
**२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती-----------------**

**प्रत-कार्यालयीन प्रत/ ज्ञापन नस्ती.**
**प्रत-साप्रवि/आय.टी.सेल.**
२/-सदरचे परिपत्रक जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्दसाठी

Scanned by CamScanner